Satyam Tower Co-operative Housing Society Ltd., Building No.2, A Wing, CTS No.638 to 640,644,683,698 to 702,638/A to H, Village Poisar,Near Thakur Polytechnic, Kandivali (East), Mumbai-400 101. **--- Applicant Versus 1. M/s.Trishul Estate Developers (Last known address)** 301,Shivam,3 rd Floor, S.V.Road,Next to Autoriders, Goregoan (West), Mumbai — 400 062, **2. M/s. Byramjee JeejeeBhoy & Co.PVT.Ltd., (Last known address)** 83,Jolly Maker Chambers II, Nariman Point, Mumbai-400 021, **3. M/s.Heritage Estates PVT LTD., (Last known address)** 83,Jolly Maker Chambers II, Nariman Point, Mumbai-400 021, **4. Gayatri Shivam Co-Operative housing Society LTD.,** Building No.2, 'B' & 'C' Wing, 90 Feet Road,Thakur Complex, Near Thakur Polytechnic, Kandivali (East), Mumbai-400 101, **5. Shivalaya Residency Co-Operative housing Society LTD.,** Building No.1, 'A' Wing, 90 Feet Road,Thakur Complex, Near Thakur Polytechnic, Kandivali (East), Mumbai-400 101, **6. Shivalik Tower Co-Operative housing Society Ltd.,** Building No.1, 'B' Wing, 90 Feet Road,Thakur Complex, Near Thakur Polytechnic, Kandivali (East), Mumbai-400 101, **7. M/s.Thakur Sons.,** Building No.3, Thakur House, Ashok Nagar, Kandivali (East), Mumbai - 400 101. **----Opponents** and those, whose interests have been vested in the said property may submit their say at the time of hearingin this the venue mentioned above. Failure to submit any say shall be presumed that nobody has any objection n this regard and further action will be taken accordingly.

Description of the Property. :-

C.T.S. No.	Survey No.	Hissa No.	Claimed Area
638 to 640, 644, 683, 698 to 702, 638/A to H Village - Poisar, Taluka - Borivali,	22	1A(Pt)	The Land bearing Survey No. 22, Hissa No.1A(Pt) corresponding CTS Nos. 638/A admeasuring 2921.01 square meters and 515.47 square meters being proportionate share in RG aggregate total 3436.49 square meters out of total 16504.70 square meters of Village Poisar, Taluka - Borivali, Mumbai Suburban District alongwith Building known as Satyam Tower CHSL.

The hearing in the above case has been fixed on **03/09/2020 at 02.15 p.m.** District Deputy Registrar, Co-operative Societies, Mumbai City (4). Bhandari Co-op.Bank building, 2nd floor, P. L. Kale Guruji Marg, Dadar (West), Mumbai-400028.

Sd/-
(Dr. Kishor Mande)
District Deputy Registrar,
Co-operative Societies, Mumbai City (4)
Competent Authority
U/s 5A of the MOFA, 1963.

Seal

Public Notice in Form XIII of MOFA (Rule 11(9) (e))
Before the Competent Authority
District Deputy Registrar, Co-operative Societies, Mumbai City (4)
Bhandari Co-op.Bank building, 2nd floor, P. L. Kale Guruji Marg, Dadar (West), Mumbai-400028.

No.DDR-4/Mum./ deemed conveyance/Notice/1153/2020 Date: - 10/08/2020
Application u/s 11 of Maharashtra Ownership Flats
(Regulation of the Promotion of construction, Sale, Management and Transfer) Act, 1963

Public Notice **Application No. 99 of 2019**

Shivalaya Residency Co-operative Housing Society Ltd., Building No.1, A Wing,CTS No. 638(A) Poisar, Near Thakur Polytechnic,Western Express Highway, Kandivali (East), Mumbai-400 101. **---- Applicant Versus 1. M/s.Thakur Sons. Promoter/Builder and Owner of Building No.3,** Thakur House, Ashok Nagar,Kandivali (East), Mumbai — 400 101, **2. M/s. Byramjee JeejeeBhoy & Co.PVT.Ltd., (Last known address)** 83,Jolly Maker Chambers II, Nariman Point, Mumbai-400 021, **3. M/s.Heritage Estates PVT LTD., (Last known address)** 83,Jolly Maker Chambers II,Nariman Point, Mumbai-400 021, **4. M/s. Trishul \ Estates Developers (Last known address)** 301,Shivam , S.V.Road,Next to Autoriders, Goregoan (West), Mumbai — 400 062, **5. Shivalik Co-Operative housing Society LTD.,** Building No.1, 'B' Wing, 90 Feet Road,Thakur Complex, Near Thakur Polytechnic,Kandivali (East), Mumbai- 0- 101, **6. Satyam Co-Operative housing Society LTD.,** Building No.2, 'A' Wing, 90 Feet Road,Thakur Complex, Near Thakur Polytechnic, Kandivali (East), Mumbai-400 101, **7. Gayatri Shivam Co-Operative housing Society LTD.,** Building No.2, 'B' & 'C' Wing, 90 Feet Road,Thakur Complex, Near Thakur Polytechnic, Kandivali (East), Muinbai-400 101. **---- Opponents** and those, whose interests have been vested in the said property may submit their say at the time of hearingin this the venue mentioned above. Failure to submit any say shall be presumed that nobody has any objection n this regard and further action will be taken accordingly.

Description of the Property. :-

C.T.S. No.	Survey No.	Hissa No.	Claimed Area
638 /A Village - Poisar, Taluka - Borivali, MSD	22	1A(Pt)	The Land bearing Survey No. 22, Hissa No.1A(Pt) corresponding CTS Nos. 638/A admeasuring 3989.20 square meters and 703.99 square meters being proportionate share in RG aggregate total 4693.28 square meters out of total 16504.70 square meters of Village Poisar, Taluka - Borivali, Mumbai Suburban District alongwith Building known as Satyam Tower CHSL.

The hearing in the above case has been fixed on **03/09/2020 at 02.00 p.m.** District Deputy Registrar, Co-operative Societies, Mumbai City (4). Bhandari Co-op.Bank building, 2nd floor, P. L. Kale Guruji Marg, Dadar (West), Mumbai-400028.

Sd/-
(Dr. Kishor Mande)
District Deputy Registrar,
Co-operative Societies, Mumbai City (4)
Competent Authority
U/s 5A of the MOFA, 1963.

Seal

‘धारावी मॉडेल’चा पुन्हा परदेशात डंका

उपनगराप्रमाणे उपचार पद्धती राबविण्याचा फिलिपिन्सचा निर्णय

मुंबई, दि. १८ (प्रतिनिधी): कोरोनावर नियंत्रण मिळवणाऱ्या ‘धारावी पॅटर्न’चे पुन्हा एकदा जागतिक स्तरावर कौतुक करण्यात आले आहे. फिलिपिन्सची राजधानी मनिला येथे ‘धारावी पॅटर्न’ राबविण्याचा निर्णय तेथील सरकारने घेतला आहे.

मुंबई महापालिकेच्या सर्व प्रभागात १०-२० च्या पुढे रुग्ण आढळत असताना धारावीत मात्र ही संख्या दहाच्या आत अगदी एकपर्यंतही आली आहे. त्यामुळे जागतिक आरोग्य संघटनेने ‘धारावी मॉडेल’ची स्तुती केली केली. त्यानंतर ‘वॉशिंग्टन पोस्ट’नेही मुंबई महापालिकेच्या धारावीमधील कौतुकास्पद कामगिरीची दखल घेतली. आता मनिलात ‘धारावी पॅटर्न’ राबविण्याचा निर्णय फिलिपिन्स सरकारने घेतला आहे.

आशिया खंडातील सर्वात मोठी दाटीवाटीची झोपडपट्टी म्हणून धारावीची ओळख आहे. याच धारावीत कोरोनाचा शिरकाव झाल्यानंतर मुंबई महापालिकेपुढे आव्हान उभे राहिले होते. मुंबई महापालिकेची झोप उडाली होती. ही वस्ती दाटीवाटीची असल्याने ‘क्लोज कॉन्टॅक्ट’मुळे संसर्ग पसरल्यास आवाक्याबाहेरील जाईल, अशी भीती पालिका प्रशासनाला होती. मात्र योग्य उपचार, घरोघरी तपासणी, संपर्कातील व्यक्तीचा त्वरीत शोध घेऊन ‘क्वारंटाईन’, ‘कंटेनमेंट झोन’ जाहीर करून कठोर अंमलबजावणी, प्रभावी उपचार व विविध ॲक्टिव्हिटीज आदींमुळे कोरोनाचा हॉटस्पॉट ठरलेल्या धारावीतील परिस्थिती नियंत्रणात आणण्यात मुंबई पालिकेला यश आले. त्यामुळे कोरोनावरील उपचारपद्धतीसाठी धारावी आता जागतिक स्तरावर अनुकरणीय ठरली आहे. मुंबई महापालिकेच्या उपचारपद्धतीचे हे यश आहे.

मनिलामध्ये धारावीसारख्या अनेक झोपडपट्ट्या दाटीवाटीने वसलेल्या आहेत. या झोपडपट्ट्यांमध्ये कोरोनाने शिरकाव केला असून कोरोनाचा संसर्ग रोखणे फिलिपिन्स सरकारच्या आवाक्याबाहेर गेल्याची स्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे तेथील कोरोना संसर्ग रोखण्यासाठी फिलिपिन्स सरकारने मुंबई महापालिकेशी संपर्क साधून ‘धारावी पॅटर्न’ची माहिती घेतली आहे. मुंबई महापालिकेचे आयुक्त इकबालसिंह चहल यांनी याबाबतची माहिती दिली. कोरोना रोखण्यासाठी ‘चेस द व्हायरस’ हे आमचे मुख्य उद्दिष्ट राहिले आहे. योग्य वेळी कोरोनाचा संसर्ग रोखण्यासाठी ‘चेस द व्हायरस’चा प्रभावीपणे उपयोग झाला आहे. हीच पॉलिसी फिलिपिन्स सरकारलाही लागू करायची आहे, असे आयुक्त इकबालसिंह चहल यांनी सांगितले. यापूर्वी मुंबई जगाचे मार्गदर्शन घेत होती, आता जगाला मुंबई मार्गदर्शक ठरत आहे, असेही चहल म्हणाले

थोडक्यात

किरीट सोमय्यांची ‘कोरोना’वर मात

मुंबई : माजी खासदार आणि भाजप नेते किरीट सोमय्या यांनी कोरोनावर मात केली आहे. किरीट सोमय्या यांनी स्वत: ट्विटरवर याबाबत माहिती दिली आहे. ‘कोरोनाविरोधात लढण्यासाठी आणि सर्वसामान्यांना मदत करण्यासाठी पुन्हा सज्ज झालो आहे,’ असे म्हणत किरीट सोमय्या यांनी कोरोनामुक्त झाल्याची माहिती दिली आहे. ‘मुलुंड येथील फोर्टिस हॉस्पिटलमध्ये दहा दिवसांच्या उपचारानंतर आम्ही कोरोनावर मात केली आहे. डॉ. राहुल पंडित आणि त्यांच्या टीमकडून करण्यात आलेल्या उपचारानंतर ''मी आणि माझी पत्नी मेधा घरी आलो आहोत. कोरोनाविरोधात लढण्यासाठी आणि सर्वसामान्यांना मदत करण्यासाठी पुन्हा सज्ज झालो आहे,'' असे किरीट सोमय्या ट्विट करत म्हणाले आहेत. १० ऑगस्ट रोजी किरीट सोमय्या आणि त्यांच्या पत्नी मेधा सोमय्या यांना कोरोनाची लागण झाली होती. त्यांनी स्वत: ट्विट करुन याबाबत माहिती दिली होती. ''मी आणि माझी पत्नी डॉ. मेधा सोमय्या यांना कोरोनाची लागण झाली आहे. सध्या रुग्णालयात आमच्यावर उपचार सुरु आहेत,'' असे ट्विट किरीट सोमय्या यांनी केले होते.

मलेरियामुळे पंधरवड्यात दोघांचा मृत्यू

मुंबई : एकीकडे कोरोनाशी निकराचा लढा देत असताना, मुंबई महापालिकेच्या आरोग्य विभागाला आता पावसाळी आजाराशी सामना करण्याची वेळ आली आहे. ऑगस्टच्या १५ दिवसांतच मुंबईत मलेरियाने दोघांचा मृत्यू झाला आहे. जुलै महिन्यात पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने पावसाळी आजारांचा प्रभाव जाणवला नाही. मात्र जुलै महिन्यात मुसळधार पाऊस कोसळताच पावसाळी आजाराचे परिणाम जाणवायला लागले. कोरोनाच्या संकटातून मुंबई सावरत असतानाच आता मुंबईवर आणखी एक संकट घोंघावू लागले आहे. कोरोनानंतर आता मुंबईत मलेरियाची साथ पसरू पाहत आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा मुंबईत मलेरियाचे रुग्ण कमी सापडले असले तरी दोघांचा मृत्यू झाला आहे. त्यामुळे आरोग्य यंत्रणेचे धाबे दणाणले आहेत. मुंबईत गेल्या वर्षी ऑगस्ट मलेरियाचे ८२४ रुग्ण सापडले होते, तर यंदा ऑगस्टमध्येच ५९२ रुग्ण सापडले आहेत. मात्र, मागील वर्षी मृत्यू नव्हते. त्यामुळे यंदा रुग्ण कमी असले तरी झालेले मृत्यू ही पालिकेसमोर चिंतेची बाब आहे. मुंबईत मलेरियापाठोपाठ ऑगस्टमध्ये लेप्टोचे १६, गॅस्ट्रोचे २३, हेपेटायटीसचे ५ आणि डेंग्यूचे सहा रुग्ण आढळले आहेत.

वांद्रे इमारत दुर्घटनेत एकाचा मृत्यू

मुंबई : वांद्रे येथे एका तीन मजली रिकाम्या इमारतीचा काही भाग शेजारील दोन दुकानांवर कोसळून एकाचा मृत्यू, तर १५ जण किरकोळ जखमी झाले. वांद्रे पश्चिम भागात रिजवी महाविद्यालयाजवळ सोमवारी रात्री उशिरा ही दुर्घटना घडली. या दुर्घटनेची माहिती मिळताच बचाव पथक आणि अग्निशमन दलाच्या आठ गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. बचाव पथकाचे काम युद्धपातळीवर सुरु होते. या दुर्घटनेत १६ जण जखमी झाले. त्यापैकी दोन जण ढिगाऱ्याखाली अडकले होते. त्यांना बाहेर काढण्यात फायर ब्रिगेडला रात्रीच यश आले. त्यापैकी लीलावती रुग्णालयात दाखल करण्यात आलेल्या जखमीचा आज मृत्यू झाला, तर भाभा रुग्णालयात दाखल असल्याने स्वतःहून ‘डिस्चार्ज’ घेतला. इमारत धोकादायक असल्याने आधीच रिकामी करण्यात आली होती. पावसाळ्यात इमारत कोसळण्याची मुंबईतील ही दुसरी घटना आहे. नुकसान झालेल्याना आणि दुर्घटनाग्रस्त कुटुंबांना शासनाने मदत करावी, अशी मागणी आमदार आशिष शेलार यांनी ट्विटद्वारे केली. त्यांनी रात्री या दुर्घटनेची पाहणी केली.

‘लॉकडाऊन’मध्ये गैरहजर राहणाऱ्या ‘बेस्ट’ कर्मचाऱ्यांवर बडतर्फीची कारवाई

नोटिसीला उत्तर न देणारे १५९ कर्मचारी बडतर्फ

मुंबई, दि. १८ (प्रतिनिधी): कोरोना प्रतिबंधासाठी पुकारण्यात आलेल्या ‘लॉकडाऊन’ काळात गैरहजर राहणाऱ्या ‘बेस्ट’च्या १५९ कर्मचाऱ्यांना बडतर्फ करण्यात आले आहे. ही संख्या अजून वाढण्याची शक्यता आहे.

‘लॉकडाऊन’ काळात अत्यावश्यक सेवा बजावणाऱ्यांमध्ये ‘बेस्ट’ कर्मचाऱ्यांनीही आपली जबाबदारी पार पाडली. परंतु, कोरोनाचे कारण देत अनेक कर्मचारी गैरहजर राहिले. त्यांना नोटिसा बजावण्यात आल्या. परंतु, नोटिसांना न जुमानणाऱ्या १५९ कर्मचाऱ्यांवर बडतर्फची कारवाई करण्यात आल्याचे अधिकाऱ्याने सांगितले.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर पुकारण्यात आलेल्या ‘लॉकडाऊन’मुळे सर्वच सुविधा, वाहतूक सेवा बंद करण्यात आल्या होत्या. मुंबईत अत्यावश्यक सेवेतील कर्मचाऱ्यांना वाहतूक सेवा पुरविण्यासाठी ‘बेस्ट’ने पुढाकार घेतला होता. परंतु, अनेक कर्मचाऱ्यांनी या कालावधीत सुरक्षेच्या दृष्टीने घरी राहणे पसंत केले. त्यांना नोटिसा बजावण्यात आल्या. तरीही सेवेत हजर न होणाऱ्यांवर बडतर्फीची कारवाई सुरूच ठेवली आहे. आतापर्यंत १५९ कर्मचाऱ्यांना सेवेतून बडतर्फ करण्यात आल्याचे अधिकाऱ्याने सांगितले.

‘लॉकडाऊन’मध्ये ‘बेस्ट’ उपक्रमाने परिवहन सेवेतील कर्मचाऱ्यांसाठी १०० टक्के उपस्थितीच्या सूचना केल्या होत्या, तर विद्युत विभागासह अन्य विभागातील कर्मचाऱ्यांसाठी १५ टक्केच उपस्थिती होती. अत्यावश्यक सेवेतील कर्मचाऱ्यांसाठी बससेवा देताना ‘लॉकडाऊन’मध्ये बेस्ट कर्मचाऱ्यांची उपस्थिती आवश्यक होती. परंतु, अनेक कर्मचारी गैरहजर राहिले आणि मनुष्यबळाअभावी सेवा देताना ‘बेस्ट’च्या नाकीनऊ आले. त्यामुळे गैरहजर कर्मचाऱ्यांना चार्जशीट देऊन कर्तव्यावर हजर राहण्याच्या सूचना केल्या. त्यानंतरही कामावर न येणाऱ्या कर्मचाऱ्यांवर बडतर्फीची कारवाई करण्यात आली आहे.

गणेशमूर्ती विसर्जनासाठीही ऑनलाईन नोंदणी

गर्दी टाळण्यासाठी खबरदारीचा उपाय » पालिकेच्या ‘डी’ विभागाचे नियोजन

मुंबई, दि. १८ (प्रतिनिधी): कोरोनाच्या पार्श्वभूमीवर यंदा गणेशोत्सव साधेपणाने करण्यात येत असला तरी त्यामध्ये गर्दी टाळण्याच्या दृष्टीने अधिक सुसूत्रता आणण्याचा प्रयत्न विभाग स्तरावर होत आहे. गणेश विसर्जनाच्या दिवशी गिरगाव चौपाटीवर भाविकांची होणारी संभाव्य गर्दी टाळण्यासाठी पालिकेच्या ‘डी’ विभागाने नियोजन केले आहे. या प्रभागात गणेश विसर्जनासाठी गणेशभक्तांना ऑनलाईन नोंदणी करावी लागणार आहे. नोंदणीनुसार पालिकेकडून गणेशभक्तांना वेळ देण्यात येणार आहे. त्यामुळे ही नोंदणी करताना त्यासाठी तारीख, वेळ, विसर्जन स्थळ आदींची माहिती नोंदवावी लागेल. त्यामुळे विसर्जनस्थळावर येणाऱ्या भाविकांच्या संख्येचा अंदाज येणार आहे.

विसर्जनासाठी गिरगाव चौपाटीवर येणाऱ्या भाविकांची संख्या मोठी आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर गर्दी टाळण्यासाठी पालिकेच्या ग्रँट रोड येथील ‘डी’ प्रभागात विसर्जनासाठी ऑनलाईन नोंदणीची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. त्यासाठी भाविकांना गिरगाव समुद्रकिनाऱ्यासह कृत्रिम तलावावर विसर्जनासाठी येणाऱ्या भाविकांना shreeganeshvisarajn.com वर नोंदणी करावी लागणार आहे.

वेळेपेक्षा अर्धा तास आधी यावे लागणार!

विसर्जनासाठी ठरलेल्या वेळेअगोदर किमान अर्धा तास तरी आधी यावे लागेल. तसेच, त्याठिकाणी जास्त वेळ थांबता येणार नाही. या निर्णयामुळे विसर्जनस्थळी गर्दी टाळण्यासाठी मदत होईल व पोलिसांवरील ताणदेखील कमी होईल.

संकेतस्थळावर ठिकाणांचा पर्याय -

ही नोंदणी घरगुतीप्रमाणेच सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनाही करावी लागेल. शनिवारपासून संकेतस्थळ कार्यान्वित झाले आहे. त्यावर गणेश विसर्जनासाठी गिल्डर लेन वसाहत, बाणगंगा, बीआयटी चाळ मैदान (मुंबई सेंट्रल), एस. एम. जोशी क्रीडांगण, ऑगस्ट क्रांती मैदान, गिल्डर लेन वसाहत, बाणगंगा, बीआयटी चाळ मैदान (मुंबई सेंट्रल), बॉडीगार्ड लेन आरटीओ, गिरगाव चौपाटी अशी ठिकाणे नमूद केली आहेत.

कृत्रिम तलाव सोसायट्यांच्या दारात; ‘जी नॉर्थ’ विभागाचा उपक्रम

गणेशोत्सव काळात गर्दी टाळण्यासाठी पालिकेच्या दादर, माहिम आणि धारावी विभागात गणेशमूर्ती विसर्जनासाठी फिरता कृत्रिम तलाव सोसायट्यांच्या दारात नेण्याचा अभिनव उपक्रम पालिकेतर्फे राबवण्यात येणार आहे. सोसायटीच्या दारातच वाहनामधील कृत्रिम तलावाच्या स्वच्छ पाण्यात बाप्पाचे विसर्जन केले जाणार असल्यामुळे पावित्र्यही राखले जाणार आहे.

मुंबईत कोरोना नियंत्रणात येत असला तरी सणासुदीच्या काळात त्याचा पुन्हा फैलाव होऊ नये म्हणून पालिकेने दक्षता घेतली आहे. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर गर्दी होऊन कोरोनाचा धोका वाढण्याची शक्यता असल्यामुळे पालिकेने मंडळे आणि घरगुती उत्सवासाठी नियमावलीच घालून दिली आहे. यामध्ये आगमन-विसर्जन मिरवणूक काढता येणार नाही, असे सक्त निर्देशही देण्यात आले आहेत. शिवाय विसर्जनाच्या वेळी संभाव्य गर्दी टाळण्यासाठी मुंबईभरात तब्बल १६७ कृत्रिम तलाव निर्माण करण्यात आले आहेत. यातच पालिकेच्या ‘जी-उत्तर’ विभागाने ‘फिरता विसर्जन कृत्रिम तलाव’ ही अभिनव संकल्पना राबवण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये पालिकेकडे संपर्क केल्यास सोसायटीच्या गेटवरच फिरत्या कृत्रीम तलावात विसर्जन करता येणार आहे. यासाठी ‘जी-उत्तर’ विभागाचा कंट्रोल रूमच्या ०२२ २४३९७८८८ या क्रमांकावर संपर्क करावा लागणार आहे.

गणेशमूर्ती चार दिवस आधीच आणा!

- मुंबई महापालिकेचे गणेशभक्तांना आवाहन
- गर्दी टाळण्यासाठी पाळण्यासाठी उपाययोजना

मुंबई, दि. १८ (प्रतिनिधी): कोरोनाचा संसर्ग टाळण्यासाठी खबरदारीचा उपाय म्हणून गणेशमूर्ती चार दिवस आधीच कार्यशाळेतून घरी आणाव्यात, असे आवाहन मुंबई महापालिकेतर्फे करण्यात आले आहे. २२ ऑगस्ट रोजी गणेशमूर्तीची प्रतिष्ठापना होत आहे.

मुंबईत रुग्णवाढीचा वेग कमी होत असला तरी महापालिकेच्या चार विभागांत हा वेग अधिक आहे. हा संसर्ग इतर भागांतही होऊ शकतो. गणेशोत्सव हा आनंदाचा आणि मोठ्या गर्दीचा सण असल्यामुळे यावर्षी मुंबईत मिरवणूक आणि विसर्जनाच्या ठिकाणी आरती करण्यास बंदी राहणार असल्याचे पालिकेने आधीच स्पष्ट केले आहे. त्यात कोरोनाचा धोका लक्षात घेता यावर्षी बाप्पाची प्रतिष्ठापना चार दिवस आधीच करा आणि गर्दी टाळा, असे आवाहन पालिका आयुक्त इकबालसिंह चहल यांनी गणेशभक्तांना केले आहे. तसेच विभाग कार्यालये व लोकप्रतिनिधींच्या माध्यमातूनही आवाहन करण्यात येणार आहे.

शनिवार, दि. २२ ऑगस्टला बाप्पाचे आगमन होणार आहे. घरगुती गणपतीचे आगमन दरवर्षी प्रतिष्ठापना आदल्या दिवशी अथवा त्याच दिवशी मोठ्या प्रमाणावर केली जाते. परंतु, यावर्षी कोरोनाचे संकट ओढावले आहे. त्यामुळे रस्त्यांवरील गर्दी टाळणे बंधनकारक आहे. त्यामुळे गणेशमूर्तीचे आगमन गणेशचतुर्थीच्या तीन ते चार दिवस आधीच करावे, असे आवाहन आयुक्तांनी गणेशभक्तांना केले आहे.

मुंबई शहरात ७० नैसर्गिक विसर्जन स्थळे ,१६७ कृत्रिम तलाव तयार करण्यात आले आहेत. ‘कंटेनमेंट झोन’मध्ये सोसायटीच्या आवारात तात्पुरती विसर्जन स्थळे तयार करण्याची परवानगी आधीच देण्यात आली आहे. कोरोनाचा धोका लक्षात घेता विसर्जन स्थळी गर्दी टाळण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तसेच ज्यांच्या भागात कृत्रिम तलाव उपलब्ध असतील त्या एक ते दोन किलोमीटर परिसरातील लोकांनी कृत्रिम तलावात बाप्पाचे विसर्जन करावे, तर नैसर्गिक विसर्जनस्थळी गणेशमूर्ती संकलनाची व्यवस्था करण्यात आली असून महापालिकेचे कर्मचारी विसर्जन करणार आहेत. नैसर्गिक विसर्जन स्थळी गणेशमूर्ती विसर्जन करण्यास बंदी घातली आहे.

पालिका सभागृहाची ५ महिन्यांनी बैठक

मुंबई, दि. १८ (प्रतिनिधी): मुंबई महापालिकेत तब्बल पाच महिन्यानंतर २० ऑगस्ट रोजी पालिका सभागृहाची बैठक आयोजित करण्यात आली आहे. मात्र, ही बैठक व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे होणार असून पालिकेचा सन २०२०-२१ चा अर्थसंकल्प या बैठकीत मंजुरीसाठी मांडण्यात येणार आहे. व्हिडिओ कॉन्फरन्सिंगला आधी कडाडून विरोध करणाऱ्या नगरसेवकांनीही आता या बैठकीला तयारी दर्शवली आहे.

कोरोनाच्या संकटामुळे मार्चपासून पालिका सभागृहाची बैठक होऊ शकलेली नाही. शेवटची बैठक १७ मार्च रोजी झाली होती. कोरोनाचा संसर्ग वाढत गेल्याने प्रशासनाने बैठक आयोजित करण्यास नकार दिला होता. पालिकेने बैठकांच्या तारखा जाहीर केल्या, मात्र त्या अचानक रद्द करण्यात आल्या. पालिकेचा अर्थसंकल्प दरवर्षी मार्च अखेरपर्यंत मंजूर केला जातो. सभागृहाच्या शेवटच्या झालेल्या बैठकीत गटनेत्यांची अर्थसंकल्पावर भाषणे झाली. मात्र कोरोना वाढत गेल्याने पुढील बैठका झाल्या नाही. त्यामुळे अर्थसंकल्पालाही मंजुरीविना राहिला होता.

अर्थसंकल्पाला मंजुरी न मिळाल्याने पालिकेचे आर्थिक गाडे रुतले आहे. तसेच नगरसेवकांना नगरसेवक निधी, विकास निधी तसेच महापौरांकडून विकासकामांसाठी सर्व राजकीय पक्षांना मिळणारा कोट्यवधी रुपयांचा निधी मिळू शकलेला नाही. परिणामी विभागातील नागरी सुविधांची कामे खोळंबली आहेत. दरवर्षी एप्रिलपासून हे तिन्ही निधी नगरसेवकांना वापरता येतात. मात्र कोरोनाच्या संकटामुळे तब्बल सहा महिने वाया गेले आहेत.

कोरोनामुळे राज्य सरकारने सर्व महापालिकांना व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे बैठका घेण्याचे निर्देश दिले आहेत. पालिकेत गेल्या पाच महिन्यांत वृक्ष प्राधिकरणाची बैठक वगळता इतर बैठका झालेल्या नाहीत. सामाजिक अंतराचा नियम पाळून सभागृह व स्थायी समितीची बैठक आयोजित करण्याची मागणी राजकीय पक्ष करत आहेत. प्रशासन त्यास नकार देत आहे. त्यावरून सर्व राजकीय पक्ष आणि प्रशासनात वाद पेटला आहे. मात्र, अधिक काळ हा वाद सुरू राहिल्यास सभागृहाची बैठक होणार नाही. परिणामी अर्थसंकल्पही मंजुरीविना रखडेल. त्यामुळे नगरसेवक निधी अभावी आपलेच नुकसान होणार असल्याची जाणीव सर्व पक्षांना झाली आहे. त्यामुळे बैठकीसाठी राजकीय पक्ष तयार झाल्याचे सांगण्यात येत आहे.

मध्य रेल्वे

शुद्धीपत्रक क्र. १

निविदा क्र. CR-BB-SnT-Works-2020-64/65. तांत्रिक आणि प्रशासकीय कारणास्तव निविदा रद्द करण्यात आली आहे. निविदा क्र. CR-BB-SnT-Works-2020-64/65 करिता शुद्धीपत्रक क्र. 1 जारी करण्यात आले आहे आणि त्याचा तपशील वेबसाईट www.ireps.gov.in वर पाहता येईल. 281

आरपीएफ सुरक्षा हेल्पलाईन 182

मध्य रेल्वे

वार्षिक देखभाल कंत्राट

अ.क्र.: 1, **कामाचे नाव:** मध्य रेल्वेच्या मुंबई विभागाच्या कल्याण आणि लोणावळा जिल्ह्यामध्ये नियंत्रण आणि रिले पॅनल आणि संख्यात्मक रिले 25 केव्ही टीएसएस/एसपी/एसएसपी (टीएसएस-8 नग, एसपी-4 नग आणि एसएसपी-11 नग. एकूण 23 नग स्थापना) मध्ये दोन वर्षांकरिता वार्षिक देखभाल कंत्राट, **अंदाजित किंमत रु.:** 91,30,867.18, **ईएमडी रु.:** 1,82,600, **निविदा अर्जाची किंमत रु.:** 5,000, **पूर्तता कालावधी:** 24 महिने. निविदा सादर करण्याचा वेळ आणि दिनांक 07.09.2020 रोजी 11.00 वाजेपर्यंत आहे. ई-निविदेचा संपूर्ण तपशील रेल्वेच्या अधिकृत वेबसाईट www.ireps.gov.in वर उपलब्ध आहे. संपूर्ण कागदपत्रे वेबसाईटवरून डाऊनलोड करता येतील. निविदेचा तपशील व. विकाअ(टीडी) कल्याण, कल्याण यांच्या कार्यालयातील **सूचना फलकावर** उपलब्ध आहे.**खुली ई-निविदा सूचना क्र. केवायएन.एलडी.583.पी.रिव्हे.2020-21 /01. कॉन्ट. दि. 14.08.2020** 283

आरपीएफ सुरक्षा हेल्पलाईन 182

महाराष्ट्र स्टेट को-ऑप. कन्ज्युमर्स फेडरेशन लि., मुंबई

(**नोंदणी क्रमांक :** बीओएम/सीओएन/- १ऑफ १९६४ दि. १२.०९.१९६४)
८७-ए, राज चेंबर्स, पाचवा मजला, देवजी रतनजी मार्ग, दाणाबंदर, मुंबई- ४०० ००९.
मुंबई कार्यालय : २३४८ ०५२०/२३४८ ४९६७ फॅक्स : २३४८ ०९३४/२३४८ ५९४०
ई-मेल : consumerfed@rediffmail.com **वेबसाईट :** www.msccfed.org.in

गाडी विकणे आहे

टोयोटा कंपनीची सन २०१३ मधील ईटीयोस मॉडेल GD 5 STR COLOUR WHITE ही गाडी क्रमांक MH-01-BG-4043 ‘जैसे आहे तैसे’ या तत्त्वावर विकणे आहे. इच्छुकांनी वरील पत्त्यावर संपर्क साधावा व देकार सीलबंद लिफाफ्यात दि. २६.०८.२०२० पर्यंत सादर करावा.
(नोट : कोणतेही कारण न देता देकार स्वीकारणे अथवा नाकारणे याचा संपूर्ण अधिकार महासंघास राहील)

सही/-
कार्यकारी संचालक

मार्कसन्स फार्मा लिमिटेड
CIN: L24110MH1992PLC066364
नोंदणीकृत कार्यालय: ११वा मजला, ग्रॅण्डीयर, वीरा देसाई विस्तारित मार्ग, ओशिवरा, अंधेरी, (पश्चिम), मुंबई-४०० ०५३.
दूरध्वनी: ०२२ ४००१ २०००; **फॅक्स क्र.:** ०२२ ४००१ २०११
वेबसाईट: www.marksanspharma.com;
ईमेल: companysecretary@marksanspharma.com

मार्कसन फार्मा लिमिटेडच्या सदस्यांना २८ वा वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी सूचना

१. **या सूचनेद्वारे सदस्यांना कळविण्यात येते कि मार्क्सन्स फार्मा लिमिटेडच्या कंपनीची अठ्ठावीस वी वार्षिक सर्वसाधारण सभा (२८ वा एजीएम),** कॉर्पोरेट अफेयर्स मंत्रालयाने जारी केलेले ८ एप्रिल, २०२० रोजीच्या परिपत्रक क्रं. १४/२०२०; १३ एप्रिल, २०२० रोजीच्या परिपत्रक क्रं. १७/२०२० आणि ५ मे, २०२० रोजीच्या परिपत्रक क्रं. २०/२०२० आणि सिक्युरिटीज अँड एक्सचेंग बोर्ड ऑफ इंडियानी १२ मे, २०२० रोजीचा जरी केलेले परिपत्रक क्रं. SEBI/HO/CFD/CMD1/CIR/P/2020/79 (ई-एजीएम परिपत्रक) यानुसार, **मंगळवार, २९ सप्टेंबर, २०२० रोजी सकाळी ११:०० वाजता, व्हिडिओ कॉन्फरन्सिंग (व्हीसी) किंवा इतर ऑडिओ व्हिज्युअल माध्यमातून (ओएव्हीएम)** आयोजित केली जाईल. सदर एजीएम सूचना, त्यात लिहलेल्या व्यवसायाचा व्यवहार करण्यासाठी सर्व सभासदांना स्वतंत्रपणे पाठवले. २८ वा एजीएमच्या सूचनेस जोडलेल्या सूचनांचे पालन करूनच सदस्य व्हीसी/ ओएव्हीएमद्वारे एजीएममध्ये येऊ शकतात.
२. ई-एजीएम परिपत्रकांच्या अनुषंगाने, २८ वा एजीएमची सूचना आणि २०१९-२०२० या आर्थिक वर्षाचा वार्षिक अहवाल सदस्यांना ई-मेलद्वारे पाठविला जाईल आणि कंपनीची वेबसाइट www.marksanspharma.com वर आणि इन्व्हेस्टर रिलेशन टॅब अंतर्गत एनएसईची वेबसाइट www.nseindia.com आणि बीएसईची वेबसाइट www.bseindia.com वर देखील उपलब्ध असतील.
३. आर्थिक वर्ष २०१९-२० चा २८ वा एजीएम आणि वार्षिक अहवालाची सूचना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने प्राप्त करण्यासाठी, **ज्या सदस्यांनी अद्याप कंपनीकडे आपला ई-मेल आयडी नोंदणी केलेला नाही** तो आपला ई-मेल आयडी कंपनीच्या निबंधक आणि हस्तांतरण एजंट, मेसर्स बिगशेअर सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेडकडे, निबंधक आणि हस्तांतरण एजंटच्या वेबसाइट: https://www.bigshareonline.com/ /InvestorRegistration.aspx वर नोंदवू शकतात.
४. सीडीएसएल ई-मतदान प्रणालीद्वारे २८ वा एजीएमच्या सूचनेत नमूद केल्यानुसार सदस्यांना व्हीसी/ओएव्हीएमद्वारे एजीएममध्ये जाण्यासाठी आणि व्यवसायावर दूरस्थपणे मतदान करण्याची सुविधा प्रदान केली जाईल. डिमटेरियलाइज्ड मोड, भौतिक मोडमध्ये आणि ज्या सदस्यांनी त्यांचे ईमेल आयडी नोंदणी केलेले नाहीत त्यांच्यासाठी रिमोट ई-मतदान करण्याची पद्धत २८ वा एजीएमच्या सूचनेमध्ये प्रदान केली जाईल.
५. ३१ मार्च २०२० रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा लाभांश २८ वा एजीएममध्ये घोषित केल्यास सदस्यांना त्यांच्या संबंधित बँक खात्यात जमा करुन देण्यात येईल. ज्या सदस्यांनी बँकेचे तपशील दिले नाहीत किंवा ज्यांना बँक तपशील बदलण्याची इच्छा असेल, त्यांच्या डिपॉझिटरी सहभागी (डिमॅट मोडमध्ये असलेल्या समभागांच्या बाबतीत) आणि कंपनीच्या कुलसचिव आणि हस्तांतरण एजंटला (प्रत्यक्ष मोडमध्ये असलेल्या समभागांच्या बाबतीत) माहिती देऊन असे करू शकतात किंवा वैकल्पिकरित्या हे येथे निबंधक आणि हस्तांतरण एजंटच्या वेबसाइट: https://www.bigshareonline.com//InvestorRegistration.aspx वर करा.

मार्क्सन्स फार्मा लिमिटेडसाठी
सही/-
हर्षवर्धन पाणीग्रही
कंपनी सचिव

मुंबई
१८ ऑगस्ट, २०२०

कोपरण लिमिटेड
नोंद. कार्यालय: पारिजात हाऊस, १०७६, डॉ. ई. मोजेस रोड, वरळी, मुंबई - ४०० ०१८.
सीआयएन: L24230MH1958PLC011078
वेबसाईट: www.kopran.com, ईमेल आयडी: investors@kopran.com,
दूर. क्र.: ०२२-४३६६१११११ फॅक्स क्र.: ०२२-२४१५०३६३
जाहीर सूचना - ६१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा

याद्वारे सूचित करण्यात येते की, कोविड-१९ महामारीचा उद्रेक लक्षात घेता, कोपरण लिमिटेडची (‘कंपनी’) वार्षिक सर्वसाधारण सभा (‘एजीएम’/‘सभा’) कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाद्वारे पारित सर्वसाधारण परिपत्रके क्र. १४/२०२० दिनांकित ८ एप्रिल, २०२०, क्र. १७/२०२० दिनांकित १३ एप्रिल, २०२०, क्र. २०/२०२० दिनांकित ५ मे, २०२० (‘एमसीए परिपत्रके’) आणि सिक्युरिटीज ॲण्ड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया द्वारे पारित परिपत्रक क्र. सेबी/एचओ/सीएफडी/सीएमडी१/ सीआयआर/पी/२०२०/७९ दिनांकित १२ मे, २०२० (‘सेबी परिपत्रक’) सह वाचावयाच्या कंपनी कायदा, २०१३ च्या लागू तरतुदी आणि त्याअंतर्गत बनविलेल्या नियमांचे पालन करत व्हिडीयो कॉन्फरन्सिंग (‘व्हीसी’)/इतर दृक् श्राव्य माध्यमांद्वारे (‘ओएव्हीएम’) आयोजित करण्यात येईल.

एजीएमबाबतच्या सूचनेमध्ये नमूद करण्यात आलेले कामकाज करण्याकरिता कोपरण लिमिटेडच्या सदस्यांची ६१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा बुधवार, दि. १६ सप्टेंबर, २०२० रोजी दु. १२.०० (भाप्रवे) वाजता नॅशनल सिक्युरिटी डिपॉझिटरी लिमिटेड (एनएसडीएल) द्वारे पुरविण्यात आलेल्या व्हीसी/ओएव्हीएम सुविधेद्वारे घेण्यात येईल.

एजीएमची सूचना, वित्तीय विवरणपत्र आणि इतर वैधानिक अहवालासह वित्तीय वर्ष २०१९-२० करिता कंपनीच्या ६१ व्या वार्षिक अहवालाची ई-प्रत (‘वार्षिक अहवाल’) कंपनीची वेबसाईट www.kopran.com आणि एनएसडीएलची वेबसाईट www.evoting.nsdl.com येथे उपलब्ध होतील. त्याशिवाय, वार्षिक अहवाल स्टॉक एक्सचेंज म्हणजेच, बीएसई लिमिटेड (‘बीएसई’) आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड (‘एनएसई’) च्या वेबसाईट्स अनुक्रमे www.bseindia.com आणि www.nseindia.com च्या संबंधित विभागामधून उपलब्ध होतील आणि मिळविता येतील

सदस्य फक्त व्हीसी/ओएव्हीएम सुविधेद्वारेच एजीएममध्ये उपस्थित राहू शकतात आणि भाग घेऊ शकतात, ज्याचा तपशील कंपनीद्वारे सभेच्या सूचनेमध्ये देण्यात येईल. त्यानुसार, कृपया नोंद घ्यावी की, कोविड-१९च्या संदर्भात शासन अधिकाऱ्यांद्वारे पारित करण्यात आलेल्या सूचनांचे पालन करताना कंपनीच्या ६१ व्या एजीएममध्ये व्यक्तिश: उपस्थित राहण्याची आणि भाग घेण्याची कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही. कंपनी कायदा, २०१३ च्या कलम ९०३ अन्वये गणसंख्या समजण्याकरिता व्हीसी/ओएव्हीएमद्वारे सभेस उपस्थित राहणाऱ्या सदस्यांची मोजणी केली जाईल.

कंपनी/रजिस्ट्रार आणि भाग हस्तांतरण एजंट्स (‘रजिस्ट्रार’)/डिपॉझिटरी पार्टिसिपन्ट्स (‘डीपी’) यांच्याकडे ईमेल आयडी नोंदणीकृत असणाऱ्या सदस्यांना वित्तीय वर्ष २०१९-२० करिता वार्षिक अहवालासह एजीएमची सूचना ईलेक्ट्रॉनिक पद्धतीने